<u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती नांदेड.</u>

दि. १५.१०.२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता नांवामनपा स्थायी समितीची सभा मनपाकेच्या मुख्य कार्यालयाचे प्रशासकिय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहात मध्ये भरविण्यात आली होती. उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. स्थाई समितीचे सदस्य उपस्थित होते.

**सौ. अनुजा अमितसिंह तेहरा, सभापती**

<u>सर्वश्री</u>

| | |
|---|---|
| मोरे संजय गंगाधर | इंदूबाई शिवाजीराव घोगरे |
| प्रविण बालाप्रसाद बियाणी | विनयकुमार गुर्रम |
| संगिता पृथ्वीराज राओत्रे | ज्योती महेंद्र खेडकर |
| सलीमा बेगम नुरुल्ला खान | शर्मा पुष्पाताई राजेश |
| कोकुलवार लक्ष्मीबाई तुळशीराम | चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह |
| फारुख हुसेन कासीम साब | |

**सभापती** उपस्थित सर्व स्थायी समितीचे स. सदस्य, प्राधिकारी अधिकारी तथा उपआयुक्त (विकास) श्री रत्नाकर वाघमारे, मुख्य लेखा परिक्षक श्री आर.एस.कोलगणे, मुख्यलेखाधिकारी श्री कंदेवाड, कार्यकारी अभियंता श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियंता श्री सुग्रीव अंधारे, सर्व विभाग प्रमुख, क्षेत्रिय अधिकारी यांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात करण्यात येते.

**उमेशसिंह चव्हाण** एमएलसीची आचारसंहिता कैंव्हाही चालू शकते त्यामूळे स.सदस्य श्री विनय गुर्रम यांचा ज्या विषयावर आक्षेप किंवा विरोध आहे असे विषय प्रलंबित ठेवून उर्वरीत विषयावर निर्णय घेण्याचे अधिकार सभापती, यांना देण्यात यावे व विषय पत्रिका पास करण्यात यावी.

**विनय गुर्रम** विषय क्र.१ हा रस्त्याचे पॅचवर्कला कार्योत्तर मान्यता देण्यासाठी विषय आहे. असे विषय आपल्या कार्यकाळात जवळपास १० महिण्यात अनेक विषय मान्यता देण्यासाठी आलेले आहे. विषय क्र.१ हा माझ्या प्रभागातील महाराणा प्रताप पुतळया जवळील रस्याचे खडे सिमेट क्रॉक्रिटने बुजविण्याचा विषय आहे. सिमेट क्रॉक्रिटने रस्तें बुजविण्याचे पॅचवर्कचे काम केव्हा होते कसे होते हे मला आजपर्यंत समजलेले नाही. प्रशासना मार्फत असे विषय महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करण्यासाठी येतात की स.सदस्यांना मॅनेज करण्यासाठी येतात, सभापतीनां माझी विनंती आहे की या कामाची सविस्तर चौकशी झाल्या शिवाय पास करण्यात येवू नये.

**उमेशसिंह चव्हाण** काम केव्हा झाले कसे झाले असे विनाकारण प्रशासनावर असे आरोप करण्यात येवू नये. सुरवातीलाच मी सांगितले की स.सदस्यांचा ज्याकामावर आक्षेप आहे ते विषय प्रलंतिबत ठेवण्यात यावे विनाकारण चर्चा करण्यात येवू नये.

**विनय गुर्रम** माझ्या प्रभागातील रस्ता असल्यामूळे मी प्रशासनाकडून खुलासा मागवित आहे.दुस-यानी हस्तक्षेप करु नये. काम चांगले झाले असते तर मला विनाकारण आरोप करण्याची गरज नव्हती.

**सभापती** श्री विनय गुर्रम यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाचा खुलासा प्रशासनाने करावा.

**उपआयुक्त तथा प्रा.अधिकारी** राज्याचे माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय गृहमंत्री कै.शंकररावजी चव्हाण यांचे पुर्णाकृती पुतळयाचे अनावर करण्यासाठी देशाचे माजी पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंघजी,कॉग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी, राज्याचे राज्यपाल हे नांदेड येथे येणार होते त्यामूळे ते ज्या रस्त्याने येणार होते त्या मुख्य रस्त्यावरील खडडे सिमेंट क्रांकिटने बुजविण्यात आले,कारण दरम्यानच्या काळात पावसाळा सुरु असल्यामूळे पावसाने मुरुम गिटी वाहून जाते म्हणून तात्पुरत्या स्वरुपात सिमेट क्रॉक्रिटने खडे बुजविण्यात आलेले आहे.कोणतेही चुकीचे काम करण्यात आलेले नाही.

**विनय गुर्रम** मी नांदेड शहराचा नागरीक आहे. आदरणीय कै.शंकररावजी चव्हाण यांचे पुतळयाचे अनावरण करण्यासाठी माजी पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंघजी, कॉग्रेस अध्यक्षा श्रीमती सोनीया गांधी नांदेडला आल्या त्याबध्दल मला अभिमान आहे गर्व आहे. रस्त्या दुरुस्ती करण्याचे केले त्यास माझा विरोध नाही, एक खड्डा बुजविण्यासाठी ४ लाख रुपये खर्च करण्यात येतात १० खडे बुजविण्यासाठी ४० लाख रुपये खर्च करण्यात येतो त्याऐवजी ४० लक्षात एका रस्त्याचे काम पुर्ण होते,सिसि रोडच्या कामाचा सर्वाना अनुभव आहे.सिमेट रोडचे पॅचवर्कचे काम करीत असतांना महानगरपालिकेचा जे.ई. सुपरवायझर कामाचे ठिकाणी उपस्थित पाहिजे. सिमेटने पॅचवर्क केल्यानंतर कंत्राटदाराने त्यावर क्युरीग करावयास पाहिजे.कंत्राटदाराने क्युरीग करतांना महानगरपालिकेचा जे. ई. सुपरवायझर त्या ठिकाणी उपस्थित होता काय याकामावर जे.ई.लक्ष देत नाही.

**का.अभियंता** रु.४,५६,९६३/-जे काम करण्यात आलेले त्यामध्ये फक्त रस्त्याचे पॅचवर्कच्या कामाचा समावेश नाही यामध्ये रोड डिव्हायडरची,फुटपाथची रंगरंगोटी, ट्राफिक पटटे या कामाच्या खर्चाचाही समावेश आहे.

**विनय गुर्रम** मी या महानगरपालिकेचा स्थायी समितीचा सदस्य असून मी एएमआरसीच्या कंत्राटदारास प्रभागातील रस्त्याचे काम सांगितले तर काम करीत नाही.जे.ई.ला सुपरवायझरला सांगा असे म्हणतात. आम्ही सांगितलेली कामे का करण्यात येत नाही.

**सभापती** आर्थिक परिस्थितीमूळे कंत्राटदाराचे वेळेवर पेमेंट होत नसल्यामूळे कंत्राटदार काम करीत नाही विषय पत्रिका सुरु करण्यात यावी.

## विषय क्रं.०१

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत **१४ जुलै २०१६ रोजी कै. शंकररावजी चव्हाण यांच्या जयंती निमित्त अण्णाभाऊ साठे चौक ते** ITI Corner **पर्यंत रस्त्याचे खड्डे बुजविण्यात आले त्यापैकी** अ **(१) मराठवाडा टो कन्सलटंट (२) बैदयनाथ बँक (३) नयामोंढा कमान नं.२ (४) नयामोंढा कमान नं.१ (५) साठे चौक (६) महाराणाप्रजाप चौक कॉंक्रीटने खड्डे बुजविण्यात आले आहेत.** ब (१) VIP Road **ते अण्णाभाऊ साठे चौक, वरील रस्ता दुभाजक व फुटपाथ रंगरंगोटी करणे (२)** VIP Road **ते भाग्यनगर** T Point **फुटपाथसह सायकल ट्रक कर्ब स्टोनची रंगरंगोटी करणे (३)** VIP **रस्त्या लगतची विसावा उदयान व विस्तारित विसावा उदयानाच्या आवारभिंतीची रंगरंगोटी करणेसाठी** या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार **रुपये ४,५६,९४३/-** चे अंदाजपत्रक तयार करुन सदर काम **प्रविण कन्सट्रक्शन नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले.

कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर प्रविण कन्सट्रक्शन नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रुपये ४,५६,९४३/- यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरीसाठीचा प्रस्ताव मनपा स्थायी समितीची समोर सादर.

**सभापती** श्री विनय गुर्रम यांचा विरोध नोंद घेवुन बहुमताने सदरचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो

**ठराव क्रं.८६** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत **१४ जुलै २०१६ रोजी कै. शंकररावजी चव्हाण यांच्या जयंती निमित्त अण्णाभाऊ साठे चौक ते** ITI Corner **पर्यंत रस्त्याचे खड्डे बुजविण्यात आले त्यापैकी** अ **(१) मराठवाडा टो कन्सलटंट (२) बैदयनाथ बँक (३) नयामोंढा कमान नं.२ (४) नयामोंढा कमान नं.१ (५) साठे चौक (६) महाराणाप्रजाप चौक कॉंक्रीटने खड्डे बुजविण्यात आले आहेत.** ब (१) VIP Road **ते अण्णाभाऊ साठे चौक, वरील रस्ता दुभाजक व फुटपाथ रंगरंगोटी करणे (२)** VIP Road **ते भाग्यनगर** T Point **फुटपाथसह सायकल ट्रक कर्ब स्टोनची रंगरंगोटी करणे (३)** VIP **रस्त्या लगतची विसावा उदयान व विस्तारित विसावा उदयानाच्या आवारभिंतीची रंगरंगोटी करणेसाठी** या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार **रुपये ४,५६,९४३/-** चे अंदाजपत्रक तयार करुन सदर काम **प्रविण कन्सट्रक्शन नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले.

कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर प्रविण कन्सट्रक्शन नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रुपये ४,५६,९४३/- यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरीच्या प्रस्तावास श्री विनय गुर्रम यांची विरोध नोंदवुन सदरचा प्रस्ताव बहुमताने हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते.

## विषय क्रं.०२

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/कोंडवाडा/८२०८/१६ दिनांक २०.०९.२०१६ अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत मोकाट जनावरे व कुत्रे पकडण्याकरिता सध्या विभागात अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने तसेच दिनांक १४.०७.१६ रोजी कै. शंकरराव चव्हाण यांच्या पुर्णाकृती पुतळयाचे उदघाटक सोहळा असल्याने या कार्यक्रमास मान्यवर व्यक्ती उपस्थित राहणार असुन तसेच पावसाळयांचे दिवस असल्याने मोकाट जनावरे व कुत्रे रस्त्यावर फिरत / बसत आहेत त्यामुहे रहदारीस अडथळा निर्माण होत आहे या बाबत तक्रारी प्राप्त होत आहेत.

१) दि. १२.०७.१६ ते १४.०७.१६ सकाळी ५.०० ते २.०० वाजता, ३.०० ते ११.०० पर्यंत दोन पाळी रुपये १०००/- प्रमाणे रुपये ६,०००/-

२) दि. १३.०७.१६ ते १४.०७.१६ पर्यंत १५x०२ दिवस रुपये ३८४/- प्रमाणे रुपये ११,५२०/-

३) दि. १३.०७.१६ ते १४.०७.१६ रु. १०००/- प्रमाणे रुपये २,०००/-

४) दि. १३.०७.१६ ते १४.०७.१६ रुपये ३८४ प्रमाणे ३,८४०/-

वरील प्रमाणे टाटा एस (छोठा) खाजगी वाहन व कंत्राटी मजुर लावणे आवश्यक आहे प्रादेशिक परिवहन अधिकारी नांदेड यांच्या दरानुसार खाजगी वाहन (ड्रायव्हर + डिझेलसह टाटाएस प्रतिदिन रुपये १०००/- प्रमाणे व खाजगी कंत्राटी मजुर लावण्यासाठी शासन परिपत्रक क्रं. संकीर्ण/२०१६/प्र.क्र.२४/नवि-२० मंत्रालय मुंबई-३२ दिनांक २२.०१.१६ मध्ये नमुद प्रतिदिन

रुपये ३८४/- प्रमाणे एकूण रुपये १७,५२० + ५८४० = २३,३६०/- (अक्षरी रुपये तेविस हजार तिशे साठ) मजुराकडून व खाजगी वाहनाकडून काम करुन घेतलेल्या कामास श्री किशोर देरमाळे, वरिष्ठ लिपीक यांनी खर्च केलेल्या कामास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता सदरील आदेशाव्दारे देण्यात आली त्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव सादर. सदरील खर्च सालसन २०१६-१७ च्या मनपा नांदेड अंदाजपत्रकातील संबंधीत लेखा शिर्षकातुन करण्या यावा.

**सभापती** प्रशासनाच्या प्रस्तावा मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्रं.८७** **ठराव**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/कोंडवाडा/८२०८/१६ दिनांक २०.०९.२०१६ अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत मोकाट जनावरे व कुत्रे पकडण्याकरिता सध्या विभागात अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने तसेच दिनांक १४.०७.१६ रोजी कै. शंकरराव चव्हाण यांच्या पुर्णाकृती पुतळयाचे उदघाटक सोहळा असल्याने या कार्यक्रमास मान्यवर व्यक्ती उपस्थित राहणार असुन तसेच पावसाळयांचे दिवस असल्याने मोकाट जनावरे व कुत्रे रस्त्यावर फिरत / बसत आहेत त्यामुहे रहदारीस अडथळा निर्माण होत आहे या बाबत तक्रारी प्राप्त होत आहेत.

१) दि. १२.०७.१६ ते १४.०७.१६ सकाळी ५.०० ते २.०० वाजता, ३.०० ते ११.०० पर्यंत दोन पाळी रुपये १०००/- प्रमाणे रुपये ६,०००/-

२) दि. १३.०७.१६ ते १४.०७.१६ पर्यंत १५x०२ दिवस रुपये ३८४/- प्रमाणे रुपये ११,५२०/-

३) दि. १३.०७.१६ ते १४.०७.१६ रु. १०००/- प्रमाणे रुपये २,०००/-

४) दि. १३.०७.१६ ते १४.०७.१६ रुपये ३८४ प्रमाणे ३,८४०/-

वरील प्रमाणे टाटा एस (छोठा) खाजगी वाहन व कंत्राटी मजुर लावणे आवश्यक आहे प्रादेशिक परिवहन अधिकारी नांदेड यांच्या दरानुसार खाजगी वाहन (ड्रायव्हर + डिझेलसह टाटाएस प्रतिदिन रुपये १०००/- प्रमाणे व खाजगी कंत्राटी मजुर लावण्यासाठी शासन परिपत्रक क्रं. संकीर्ण/२०१६/प्र.क्र.२४/नवि-२० मंत्रालय मुंबई-३२ दिनांक २२.०१.१६ मध्ये नमुद प्रतिदिन रुपये ३८४/- प्रमाणे एकूण रुपये १७,५२० + ५८४० = २३,३६०/- (अक्षरी रुपये तेविस हजार तिशे साठ) मजुराकडून व खाजगी वाहनाकडून काम करुन घेतलेल्या कामास श्री किशोर देरमाळे, वरिष्ठ लिपीक यांनी खर्च केलेल्या कामास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता सदरील आदेशाव्दारे देण्यात आली त्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते.

## विषय क्रं.०३

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत क्षेत्र - **अ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने बेलानगर, विकासनगर, राजसारथीनगर, झेन्डा चौक, स्वागतनगर, पाटबंधारेनगर, तरोडा (बु) बुध्दविहार, सरपंचनगर, ओमकारेश्वर नगर, सप्तगिरी कॉलनी या भागात मुरुम व ६ एमएम टाकण्यात आले तसेच विजयनगर, सप्तगिरी कॉलनी, राजसारथीनगर, विकासनगर या भागात JCB मशिनव्दारे बुध्दविहार समोरील मैदानाचे Level करणेसाठी** या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार **रु. १,९९,४२८/-** चे अंदाजपत्रक तयार करुन सदर काम **मे. ग्लोबल इन्टरप्रायजेस नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले.

कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर मे. ग्लोबल इन्टरप्रायजेस नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रु. १,९१,४२८/- यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तय प्रशासकिय व आर्थीक मंजुरीसाठीचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** प्रशासनाच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्रं.८८** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत क्षेत्र - **अ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने बेलानगर, विकासनगर, राजसारथीनगर, झेन्डा चौक, स्वागतनगर, पाटबंधारेनगर, तरोडा (बु) बुध्दविहार, सरपंचनगर, ओमकारेश्वर नगर, सप्तगिरी कॉलनी या भागात मुरुम व ६ एमएम टाकण्यात आले तसेच विजयनगर, सप्तगिरी कॉलनी, राजसारथीनगर, विकासनगर या भागात JCB मशिनव्दारे बुध्दविहार समोरील मैदानाचे Level करणेसाठी** या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार **रु. १,९९,४२८/-** चे अंदाजपत्रक तयार करुन सदर काम **मे. ग्लोबल इन्टरप्रायजेस नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले.

कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर मे. ग्लोबल इन्टरप्रायजेस नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रु. १,९१,४२८/- यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तय प्रशासकिय व आर्थीक मंजुरी हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते.

## विषय क्रं.०४

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत क्षेत्र - **ब मध्ये महाराणा प्रताप यांच्या पुर्णाकृती पुतळयाच्या परिसराचे सुशाभीकरण करणे, रंगरंगोटी करणे महाराणा प्रताप यांच्या पुर्णाकृती पुतळयाला नविन कलर लावणे पुतळयाच्या मागील बाजुस असलेल्या देखावा पाहाडीला नविन शेडचा कलर लावणे, कंपाऊंड भिंतीला नविन कलर लावणे, पुर्णाकृती पुतळा लोकर्पन सोहळयाच्या नविन कोनशीला बनविण्यासाठी या विभागाचे कनिष्ठ अ भियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची** २०१५-१६ नुसार **रु. ५,४०,१००/-** चे अंदाजपत्रक तयार करुन सदर काम **मे. सोहेल कन्सट्रक्शन नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले. कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर मे. सोहेल कनसट्रक्शन नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रु. ५,४०,१००/- यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तय प्रशासकिय व आर्थीक मंजुरीसाठीचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास कार्योत्तर प्रशासकिय आर्थीक मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्रं.८९** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत क्षेत्र - **ब मध्ये महाराणा प्रताप यांच्या पुर्णाकृती पुतळयाच्या परिसराचे सुशाभीकरण करणे, रंगरंगोटी करणे महाराणा प्रताप यांच्या पुर्णाकृती पुतळयाला नविन कलर लावणे पुतळयाच्या मागील बाजुस असलेल्या देखावा पाहाडीला नविन शेडचा कलर लावणे, कंपाऊंड भिंतीला नविन कलर लावणे, पुर्णाकृती पुतळा लोकर्पन सोहळयाच्या नविन कोनशीला बनविण्यासाठी या विभागाचे कनिष्ठ अ भियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची** २०१५-१६ नुसार **रु. ५,४०,१००/-** चे अंदाजपत्रक तयार करुन सदर काम **मे. सोहेल कन्सट्रक्शन नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले. कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर मे. सोहेल कनसट्रक्शन नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रु. ५,४०,१००/- यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तय प्रशासकिय व आर्थीक मंजुरी हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते.

## विषय क्रं.०५

नावाशमनपा हद्दीत **प्रभाग क्रं. २० बोरबन फॅक्ट्री भागात पोलीस हेडक्वार्टर सुरक्षा भिंत ते डी.पी. क्रं. ३३७ ते BSUP दलीत वस्ती पर्यंत सि.सि. रोडचे बांधकाम करणे रुपये ४२,४३,८३१/-** साठी ई. टेंडर सेल व्दारे निविदा सुचना जा.क्रं. साबांवि/१०१२/ २०१६ दि. २६.०४.१६ अन्वये दै. एकमत / दै वरक ए ताजा या वर्तमान पत्रात दिनांक २७.०४.१६ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली असता उपरोक्त कामासाठी एकूण ३ निविदा प्राप्त झाले प्राप्त निविदा त्रीसदस्यीय समिती समोर दिनांक ०२.०६.१६ रोजी उघडण्यात आले असता त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| ०१ | मे. एल अन्ड एस कन्सट्रक्शन नांदेड | ०.०१% कमी दराने |
| ०२ | सोहेल कन्सट्रक्शन नांदेड | ४% जास्त दर |
| ०३ | प्रविण कन्सट्रक्शन नांदेड | ६% जास्त दर |

तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा मे. एल अन्ड एस कन्सट्रक्शन नांदेड यांची निविदा अंदाजपत्रक दरापेक्षा ०.०१% कमी दराची आहे. करिता **प्रभाग क्रं. २० पोलीस हेडक्वार्टर सुरक्षा भिंत ते डी.पी. क्रं. ३३७ ते BSUP दलीत वस्ती पर्यंत सि.सि. रोडचे बांधकाम करणे मे. एल.अन्ड एस कन्सट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रक दरापेक्षा ०.०१% कमी दराची असल्याने मंजुरीस्तव प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.**

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या निविदा मंजुरीचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते

**ठराव क्रं.९०** **ठराव**

नावाशमनपा हद्दीत **प्रभाग क्रं. २० बोरबन फॅक्ट्री भागात पोलीस हेडक्वार्टर सुरक्षा भिंत ते डी.पी. क्रं. ३३७ ते BSUP दलीत वस्ती पर्यंत सि.सि. रोडचे बांधकाम करणे रुपये ४२,४३,८३१/-** साठी ई. टेंडर सेल व्दारे निविदा सुचना जा.क्रं. साबांवि/१०१२/ २०१६ दि. २६.०४.१६ अन्वये दै. एकमत / दै वरक ए ताजा या वर्तमान पत्रात दिनांक २७.०४.१६ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली असता उपरोक्त कामासाठी एकूण ३ निविदा प्राप्त झाले प्राप्त निविदा त्रीसदस्यीय समिती समोर दिनांक ०२.०६.१६ रोजी उघडण्यात आले असता त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| ०१ | मे. एल अन्ड एस कन्सट्रक्शन नांदेड | ०.०१% कमी दराने |
| ०२ | सोहेल कन्सट्रक्शन नांदेड | ४% जास्त दर |
| ०३ | प्रविण कन्सट्रक्शन नांदेड | ६% जास्त दर |

तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा मे. एल अन्ड एस कन्सट्रक्शन नांदेड यांची निविदा अंदाजपत्रक दरापेक्षा ०.०१% कमी दराची आहे. करिता **प्रभाग क्रं. २० पोलीस हेडक्वार्टर सुरक्षा भिंत ते डी.पी. क्रं. ३३७ ते BSUP दलीत वस्ती**

**पर्यंत सि.सि. रोडचे बांधकाम करणे मे. एल. अन्ड एस कन्सट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रक दरापेक्षा ०.०१% कमी दराची निविदा हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते.**

## विषय क्रं.०६

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत **सिडको भागात १ जुलै रोजी वृक्षारोपन कार्यक्रमा करिता मा. ना. श्री दिवाकर रावजे मंत्री परीवहन तथा पालकमंत्री नांदेड-परभणी दो-या निमित्त तालुका क्रिडा संकुलाचा जागेत दोन कोटी सिडको वृक्ष लागवडी कार्यक्रमास उपस्थित राहणार होते. त्या अनुषंगाने आदेशीत केल्याप्रमाणे कौठा साईबाबा कमान ते वसरणी, ढवळे कॉर्नर ते संभाजी चौक ते कुसूमताई शाळा ते इंदिरा गांधी कॉलेज ते तालुका क्रिडा संकुल सिडको पर्यंतचा रस्ता दुरुस्त करणे आवश्यक होते तसेच इंदिरा गांधी कॉलेज ते क्रिडा संकुलचा रस्ता काळया मातीचा नादुरुस्त होते.** त्यामुळे विना निविदा तात्काळ काम हाती घेण्यात आले सदरील ठिकाणी रस्ता दुरुस्त करण्यासाठी मुरम्, GSB व ६ MM Crusher Broken Stone ई. साहित्य टाकुन रस्ता दुरुस्त करुन देण्यात आला आहे प्रचलीत जिल्हादरसुची २०१५-१६ नुसार **रुपये ७,६३,४७५/-** अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर काम **मे. प्रविण कन्सट्रक्शन नांदेड** यांच्याकडून करुन घेण्यात आलेले आहे.

कामाची तातडी निकड लक्षात घेता सदरचे काम रास्त पध्दतीने निविदा न मागविता अंदाजपत्रक दरावर मे. प्रविण कन्सट्रक्शन नांदेड यांच्याकडून करुन घेण्यात आले त्यास व कामासाठी झालेला खर्च रुपये ७,६३,४७५/- यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरीस्तव प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास प्रशासकिय कार्योत्तर मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं.९१** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत **सिडको भागात १ जुलै रोजी वृक्षारोपन कार्यक्रमा करिता मा. ना. श्री दिवाकर रावजे मंत्री परीवहन तथा पालकमंत्री नांदेड-परभणी दो-या निमित्त तालुका क्रिडा संकुलाचा जागेत दोन कोटी सिडको वृक्ष लागवडी कार्यक्रमास उपस्थित राहणार होते. त्या अनुषंगाने आदेशीत केल्याप्रमाणे कौठा साईबाबा कमान ते वसरणी, ढवळे कॉर्नर ते संभाजी चौक ते कुसूमताई शाळा ते इंदिरा गांधी कॉलेज ते तालुका क्रिडा संकुल सिडको पर्यंतचा रस्ता दुरुस्त करणे आवश्यक होते तसेच इंदिरा गांधी कॉलेज ते क्रिडा संकुलचा रस्ता काळया मातीचा नादुरुस्त होते.** त्यामुळे विना निविदा तात्काळ काम हाती घेण्यात आले सदरील ठिकाणी रस्ता दुरुस्त करण्यासाठी मुरम्, GSB व ६ MM Crusher Broken Stone ई. साहित्य टाकुन रस्ता दुरुस्त करुन देण्यात आला आहे प्रचलीत जिल्हादरसुची २०१५-१६ नुसार **रुपये ७,६३,४७५/-** अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर काम **मे. प्रविण कन्सट्रक्शन नांदेड** यांच्याकडून करुन घेण्यात आलेले आहे.

कामाची तातडी निकड लक्षात घेता सदरचे काम रास्त पध्दतीने निविदा न मागविता अंदाजपत्रक दरावर मे. प्रविण कन्सट्रक्शन नांदेड यांच्याकडून करुन घेण्यात आले त्यास व कामासाठी झालेला खर्च रुपये ७,६३,४७५/- यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरी हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते.

## विषय क्रं.०७

नावाशमनपा **हद्दीत प्रभाग क्रं. ५ मध्ये परिनगर भागात अरबी स्कुल ते रमेश यादव यांच्या घरा पर्यंत सी.सी. रस्ता** करणेसाठी या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुनजिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार **रुपये ८७,८०५/-** चे अंदाजपत्रक तयार करुन सदर काम **मे. एल न्ड एस कन्सट्रक्शन नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले.

कामाची तातडी निकड लक्षात घेता सदरचे काम रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर मे. एल न्ड एस कन्सट्रक्शन नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामासाठी झालेला खर्च रुपये ८७,८०५/- यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरीस्तव प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं.९२** **ठराव**

नावाशमनपा **हद्दीत प्रभाग क्रं. ५ मध्ये परिनगर भागात अरबी स्कुल ते रमेश यादव यांच्या घरा पर्यंत सी.सी. रस्ता** करणेसाठी या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुनजिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार **रुपये ८७,८०५/-** चे अंदाजपत्रक तयार करुन सदर काम **मे. एल न्ड एस कन्सट्रक्शन नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले.

कामाची तातडी निकड लक्षात घेता सदरचे काम रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर मे. एल न्ड एस कन्सट्रक्शन नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामासाठी झालेला खर्च रुपये ८७,८०५/- यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरी हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते.

## विषय क्रं.०८

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत **प्रभाग क्रं. १८ भागात रमजान ईद निमित्त रस्ते दुरुस्ती करण्यासाठी या विभागाचे कनिष्ठ अभियंता उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन पप्पड गल्ली येथील मस्जीदीच्या परिसरातील अंतर्गत**

**रस्त्यावरील** Soling Murum GSB **व ६mm ट्रॅक्टरच्या साहयाने रस्त्याची दुरुस्ती करणेसाठी** आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार झालेल्या कामाचे अंदाजपत्रक रु. ६,३९,२००/- चे तयार करुन सदर काम **विलायत खान करीम खान नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले. कामाची तातडी निकड लक्षात घेता सदरचे काम रास्त पध्दतीने निविदा न मागविता अंदाजपत्रक दरावर विलायत खान करीम खान नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामासाठी झालेला खर्च रुपये ६,३९,२००/- यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरीस्तव प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं.९३** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत **प्रभाग क्रं. १८ भागात रमजान ईद निमित्त रस्ते दुरुस्ती करण्यासाठी या विभागाचे कनिष्ठ अभियंता उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन पप्पड गल्ली येथील मस्जीदीच्या परिसरातील अंतर्गत रस्त्यावरील** Soling Murum GSB **व ६mm ट्रॅक्टरच्या साहयाने रस्त्याची दुरुस्ती करणेसाठी** आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार झालेल्या कामाचे अंदाजपत्रक रु. ६,३९,२००/- चे तयार करुन सदर काम **विलायत खान करीम खान नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले. कामाची तातडी निकड लक्षात घेता सदरचे काम रास्त पध्दतीने निविदा न मागविता अंदाजपत्रक दरावर विलायत खान करीम खान नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामासाठी झालेला खर्च रुपये ६,३९,२००/- यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरी हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते.

## विषय क्रं.०९

नावाशमनपा हद्दीत **गोवर्धनघाट पुलावर** SDBC **चा एक लेयर मारणेच्या कामाबाबत** या विभागाचे उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पहाणी करुन वजिराबाद चौक ते रवीनगर कौठाकडे जाणा-या गोवर्धनघाट पुलावर दोन्ही बाजुने रस्त्यावर ब-याच प्रमाणात खड्डे पडलेले आहेत असा अहवाल दिला असुन पुलावरील खड्डे दुरुस्ती करणे आवश्यक असल्यामुळे आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हादरसुची २०१५-१६ नुसार **रुपये ४०,०१,३९८/-** चे अंदाजपत्रक तयार करुन सादर केले आहे. करिता नावाशमनपा हद्यीत गोवर्धनघाट पुलावर SDBC चा एक लेयर मारणेच्या कामासाठी लागणारी रक्कम **रुपये ४०,०१,३९८/- यास अर्थसंकल्प २०१६-१७ मधील** JNNURM, BSUP **नगरोत्थान, द.व.सु. योजना तसेच विविध योजने अंतर्गत झालेल्या विकास कामाची देखभाल व दुरुस्ती या लेखाशिर्षकातुन प्रशासकिय व आर्थीक मंजुरीसाठीचा** प्रस्ताव मनपा स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं.९४** **ठराव**

नावाशमनपा हद्यीत **गोवर्धनघाट पुलावर** SDBC **चा एक लेयर मारणेच्या कामाबाबत** या विभागाचे उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पहाणी करुन वजिराबाद चौक ते रवीनगर कौठाकडे जाणा-या गोवर्धनघाट पुलावर दोन्ही बाजुने रस्त्यावर ब-याच प्रमाणात खड्डे पडलेले आहेत असा अहवाल दिला असुन पुलावरील खड्डे दुरुस्ती करणे आवश्यक असल्यामुळे आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हादरसुची २०१५-१६ नुसार **रुपये ४०,०१,३९८/-** चे अंदाजपत्रक तयार करुन सादर केले आहे. करिता नावाशमनपा हद्यीत गोवर्धनघाट पुलावर SDBC चा एक लेयर मारणेच्या कामासाठी लागणारी रक्कम **रुपये ४०,०१,३९८/- यास अर्थसंकल्प २०१६-१७ मधील** JNNURM, BSUP **नगरोत्थान, द.व.सु. योजना तसेच विविध योजने अंतर्गत झालेल्या विकास कामाची देखभाल व दुरुस्ती या लेखाशिर्षकातुन प्रशासकिय व आर्थीक मंजुरी हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते.**

## विषय क्रं.१० प्रस्ताव

कार्यकारी अभियंता बिएसयुपी यांनी दि. २१.०४.१६ रोजी पोलीस स्टेशन वजिराबाद नांदेड येथे बिएसयुपी योजने अंतर्गत कसाईट क्रं. ३४ येथील वसुली लिपीक श्री सुरेंद्र सोनाजी सोनकांबळे यांनी महापालिकेच्या रक्कमेचा अपहार केला आहे तसेच पावती पुस्तक वाटपात श्री सुरेश गोविंदराव कुलर्णी प्र. कार्यालय अधिक्षक यांनी अनियमीतता केली आहे अशी तक्रार नोंदविली आहे. अभिलेख पर्यवेक्षक नावाशमनपा नांदेड यांनी श्री सुरेश गोविंदराव कुलकर्णी यांच्या विनंतीनुसार बिएसयुपी विभागचा अभिप्राय घेऊन कार्यालयीन पत्र क्रं. १६९२ दिनांक ०९.०५.१६ व क्रं. १७०७ दि. १०.०५.१६ व्दारे श्री सुरेश गोविंदराव कुलकर्णी यांना पावती पुस्तक वाटप करणे किंवा देणे याबाबत कोणतेही कार्यालयीन आदेश दिलेले नाहीत तसेच संबंधीताच्या बिएसयुपी विभागातील दि. १७.०१.१२ ते ०७.११.१३ या कालावधीत पावती पुस्तक वाटप व इतर कामांसंदर्भात अनियमीतता केल्यासंबंधी कोणतीही कारणे दाखवा नोटीस दिलेली नाही असे लेखी कळविले आहे.

वरील बाब विचारात घेता सदरील अपहार प्रकरणात श्री सुरेश गोविंदराव कुलकर्णी यांचा सहभाग असल्याचे दिसून येत नाही त्यामुहे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४८१ (ह) मधील तरतुदीनुसार पोलीस स्टेशन वजिराबाद येथे दिलेल्या तक्रारीतुन त्यांचे नांव वगळुन त्यांचे विरुध्द केलेली तक्रार मागे घेण्याची ही स्थायी समितीची सभा सर्वानुमते समंत करते.

**सुचक** :- संजय गंगाधरराव मोर **अनुमोदक**:- सौ. संगिता राओत्रे

**सभापती** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.९५** **ठराव**

कार्यकारी अभियंता बिएसयुपी यांनी दि. २१.०४.१६ रोजी पोलीस स्टेशन वजिराबाद नांदेड येथे बिएसयुपी योजने अंतर्गत कसाईट क्रं. ३४ येथील वसुली लिपीक श्री सुरेंद्र सोनाजी सोनकांबळे यांनी महापालिकेच्या रक्कमेचा अपहार केला आहे तसेच पावती पुस्तक वाटपात श्री सुरेश गोविंदराव कुलर्णी प्र. कार्यालय अधिक्षक यांनी अनियमीतता केली आहे अशी तक्रार नोंदविली आहे. अभिलेख पर्यवेक्षक नावाशमनपा नांदेड यांनी श्री सुरेश गोविंदराव कुलकर्णी यांच्या विनंतीनुसार बिएसयुपी विभागचा अभिप्राय घेऊन कार्यालयीन पत्र क्रं. १६९२ दिनांक ०९.०५.१६ व क्रं. १७०७ दि. १०.०५.१६ व्दारे श्री सुरेश गोविंदराव कुलकर्णी यांना पावती पुस्तक वाटप करणे किंवा देणे याबाबत कोणतेही कार्यालयीन आदेश दिलेले नाहीत तसेच संबंधीताच्या बिएसयुपी विभागातील दि. १७.०१.१२ ते ०७.११.१३ या कालावधीत पावती पुस्तक वाटप व इतर कामांसंदर्भात अनियमीतता केल्यासंबंधी कोणतीही कारणे दाखवा नोटीस दिलेली नाही असे लेखी कळविले आहे.

वरील बाब विचारात घेता सदरील अपहार प्रकरणात श्री सुरेश गोविंदराव कुलकर्णी यांचा सहभाग असल्याचे दिसून येत नाही त्यामुहे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४८१ (ह) मधील तरतुदीनुसार पोलीस स्टेशन वजिराबाद येथे दिलेल्या तक्रारीतुन त्यांचे नांव वगळुन त्यांचे विरुध्द केलेली तक्रार मागे घेण्याची ही स्थायी समितीची सभा सर्वानुमते समंत करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

## विषय क्रं.११

**<u>माननिय सभापती स्थाई समिती,</u>**

**<u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांचे न्यायालयात अपिल</u>**

**<u>प्रकरण:-</u>** **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 56(4) मधील तरतुदीनुसार कार्यालयीन आदेश क्र.नांवाशमनपा/आकक्ष/8798/2016 दि.29/09/2016 चे आदेशाविरुध्द अपिल.**

### <u>अपिल</u>

हे की, भुतपूर्व वाघाळा नगरपालिका या कार्यालयात माझी प्रथम नियुक्ती दिनांक 22/09/1988 रोजी झाली. आणि नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत दि.06/02/2006 रोजी माझी सहाय्यक आयुक्त या पदावर पदोन्नती झालेली आहे.

हे की, उक्त प्रकरणीचे आदेश निर्गमित झाल्याचे कळताच मी, मा.आयुक्त यांना औद्योगिक न्यायालयात जाण्याची नोटीस देवून दि.01/10/2016 रोजी मा.औद्योगिक न्यायालय जालना येथे सदरचे आदेशा विरुध्द स्थगिती आदेश देण्याची विनंती करुन केस पुढे चालविण्याची विनंती केलेली होती. या प्रकरणात माझी बाजू आणि महानगरपालिका प्रशासनाची बाजू मा.न्यायालयासमोर मांडणेसाठी दि.04/10/2016 ही तारिख दिली होती. मा.औद्योगिक न्यायालय जालना यांनी दि. 04/10/2016 रोजी दोन्ही पक्षांची बाजू ऐकून घेऊन सहाय्यक आयुक्त हे पद कामगाराच्या व्याख्येत मोडत नाही असे म्हणून स्थगिती आदेश देण्याचे नाकारुन पुढील तारिख 29/10/2016 ही तारिख पुढील सुनावणीसाठी ठेवली होती. मा.न्यायालयाने स्थगिती आदेश देण्यास नकार दिल्यामुळे मी मा. न्यायालयातून माझी केस परत घेतली. मी मा. औद्योगिक न्यायालय जालना येथून केस परत घेतलेली असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 56(4) अन्वये मा.आयुक्त यांचे निकटवर्ती वरिष्ठ प्राधिकारी म्हणून मा. स्थायी समिती आहे. मा. आयुक्त यांनी निर्गमित केलेले आदेश दि.29/09/2016 हे माझ्यावर अन्याय करणारे असल्यामुळे मी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 56(4) अन्वये माझ्यावरील अन्यायाच्या निवारणार्थ मा. सभापती, स्थायी समिती यांचेकडे अपिल दाखल करीत आहे.

हे की, मा.आयुक्त यांचे निकटवर्ती जेष्ठ प्राधिकारी मा.स्थायी समिती असल्याने मा.स्थायी समितीकडून मला न्याय मिळेल हा माझा हक्क अबाधीत ठेवून मी कार्यालयीन आदेश दि.29/09/2016 चे सन्मानार्थ दि.05/10/2016 रोजी क्षेत्रिय कार्यालय क्र.ड येथे कर्तव्यावर रुजू झालो आहे.

हे की, महाराष्ट्र नागरी सेवा नियमांतर्गत महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 कलम 4 व नियम 2013 मधील तरतुदींनुसार शासकीय कर्मचा-यांच्या वर्षाचे आत मध्यावधी बदल्यांवर निर्बंध घातलेले आहेत तसेच महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही/2014/मुस-34/प्रक्र.379/12 मंत्रालय मुंबई दिनांक 24/09/2015 नुसार वर्षाचे मध्यावधीत बदली करतांना बदली कायद्यातील तरतुदीचे पालन करणे बाबत मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. सदर परिपत्रकात मध्यावती बदली करावयाची झाल्यास बदलीचे कारण आदेशात नमुद असावयास पाहीजे. तसेच 03 वर्ष पूर्ण झाल्याशिवाय बदली करता येणार नाही अशी तरतुद आहे. म्हणून दि.29/9/2016 रोजीचे आदेश रद्द करण्यात यावेत.

हे की, उक्त प्रकरणी नमुद केलेल्या दिनांक 29/09/2016 चे आदेशान्वये माझी पदस्थापना महानगरपालिकेच्या स्वच्छता व आरोग्य विभागातून झोन क्र.ड मध्ये करण्यात आलेली आहे. सदर आदेशात बदलीचे कारण नमुद केलेले नाही. त्यामुळे उक्त अधिनियम 2005, नियम 2013 आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार करण्यात आलेली बदली नियम बाह्य आहे. श्री संजय जाधव, सहा.आयुक्त यांची पदस्थापना क्षेत्रिय कार्यालय क्र.ड मध्ये दिनांक 19/03/2016 रोजी झालेली होती. त्यांना क्षेत्रिय कार्यालय क्र. ड येथे रुजू होऊन जेमतेम 06 महिनेच झालेले असतांना त्यांना मी कार्यरत असलेल्या स्वच्छता व आरोग्य विभागात दि.30/09/2016 रोजीच तात्काळ रुजू करुन घेण्यात आले यावरुन असे दिसून येते की, सदरची माझी बदली ही सुड भावनेने नियम डावलून कुटील हेतूने मला मानसिक त्रास व्हावा या उद्देशाने केली म्हणून सदर बदली आदेश रद्द करण्यात यावा म्हणून हे अपील करीत आहे.

हे की, स्वच्छता व आरोग्य विभागात सहा. आयुक्त या पदावर कार्यालयीन आदेश क्र.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-१/17631/2014 दि.26/12/2014 अन्वये माझी पदस्थापना करण्यात आली. माझ्या सेवेस शासन परिपत्रकानुसार 03 वर्ष पूर्ण झाले नसतांना देखील माझी बदली झोन क्र.ड येथे नियमबाह्य रित्या करण्यात आली तसेच श्री संजय जाधव, सहा.आयुक्त यांची पदस्थापना दि.19/03/2016 रोजी क्षेत्रिय कार्यालय क्र.ड येथे करण्यात येवून त्यांचे सेवेस केवळ 06 महिनेच झाले असतांना त्यांची बदली क्षेत्रिय कार्यालय क्र.ड येथून स्वच्छता विभागात

दि.29/09/2016 रोजी नियमबाह्य करण्यात आली. आम्ही दोघेही बदलीस पात्र नसताना बदली करण्यात आली. उक्त महाराष्ट्र नागरी सेवा नियम आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार सदरची बदली नियमबाह्य असून ही बदली केवळ मी मागासवर्गीय असल्यामुळे व मला मानसिक त्रास देण्याचे उद्देशानेच बदली करण्यात आलेली असल्यामुळे सदर बदली आदेश रद्द करण्यात यावा.

हे की, दिनांक 29/09/2016 चे बदली आदेशात एकूण (04) मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी आहेत. श्री अविनाश अटकोरे, सहा.आयुक्त यांची बदली मुख्य कार्यालयात केली ते मागासवर्गीय आहेत. सदर आदेशात काही अधिका-यास दोन दोन विभाग देण्यात आलेले आहेत. तथापि श्री अविनाश अटकोरे हे केवळ मागासवर्गीय अधिकारी असल्यामुळे त्यांना कोणताही विभाग न देता मुख्यालयात बदली करुन त्यांना बिनखात्याचा अधिकारी ठेवले आहे. सदरचे कृत्य हे त्यांच्यावर अन्यायकारक आहे, असे दिसून येते. अधिकारी उपलब्ध असतांना सर्व अधिका-यांना एक स्वतंत्र विभाग देवून तशा प्रकारच्या बदल्या अपेक्षित असतात. ते ही 03 वर्ष कालावधी पूर्ण झाल्यानंतर. परंतु कोणत्याही नियमाचे पालन केले गेलेले नाही. सदरचे आदेशात श्रीकृष्ण झाकडे, सहाय्यक विधी अधिकारी हे मागासवर्गीय असून त्यांची बदली मालमत्ता व्यवस्थापक या पदावरुन विधी सहाय्यक या पदावर विधी विभागात केली आहे. प्र.मालमत्ता व्यवस्थापक या पदावर श्री झाकडे हे केवळ 01 वर्ष 05 महिने कार्यरत होते. मध्येच त्यांचीही 03 वर्ष कालावधी पूर्ण झाला नसतांनाही त्यांची बदली करण्यात आली. तसेच श्री पंडीत पेमो जाधव, प्र.सहा.आयुक्त हे मागासवर्गीय असून त्यांची बदली कर विभागातून सदर आदेशान्वये कोंडावाडा विभाग येथे करण्यात आली आहे. बदली पूर्वीचे कर विभागातील पदावर श्री पंडीत पेमो जाधव यांनी केवळ 06 महिने काम केले त्यांचाही 03 वर्ष कालावधी पूर्ण झालेला नाही. महानगरपालिका कोंडवाडा आस्थापनेवर सहा.आयुक्त किंवा इतर पदे मंजुर नसताना मंजुर नसलेल्या पदावर त्यांची बदली करुन त्यांचेवर केवळ ते मागासवर्गीय असल्याने अन्याय केला आहे. एकाच बदली आदेशाद्वारे एकूण (04) मागासवर्गीय अधिका-यांवर अन्याय केलेला असलयाने सदर बदली आदेश रद्द करण्यात यावा.

हे की, दिनांक 28/09/2016 रोजीचे बदली आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर बदली आदेशात अनु.क्र.1 वरील श्रीकृष्ण झाकडे तसेच स.अजितपालसिंघ संधु यांची बदली करण्यात आली. आणि दिनांक 29/09/2016 चे आदेशात सुध्दा सदर दोन्हीही अधिका-यांची पुन्हा त्याच पदावर आणि त्याच विभागात बदली करुन पूर्वीच्या आदेशातीलच विभागात त्यांची बदली दर्शविण्यात आलेली आहे. तथापि नव्याने निर्गमित केलेल्या दिनांक 29/09/2016 चे आदेशात पूर्वीचे आदेश अधिक्रमीत केलेले नाहीत. दोन दिवसात दोन आदेश मनमानी पध्दतीने निर्गमित करुन महानगरपालिका प्रशासनाच्या भोंगळ कारभाराचे प्रदर्शन केलेले प्रकर्षाने दिसून येते. त्यामुळे दिनांक 29/09/2016 चे बदली आदेश रद्द करण्यात यावे.

हे की, दि.28/09/2016 आणि दि.29/09/2016 रोजी निर्गमित झालेले आदेश हे महानगरपालिकेच्या आस्थापना विभागातून किंवा आयुक्त कक्षातून निघालेले नसून ते आदेश महानगरपालिकेच्या तथाकथित अधिका-याच्या कक्षातून निघालेले असून मा.आयुक्त साहेबांची दिशाभूल करुन कामाच्या घाई गर्दीत स्वाक्षरी घेतलेली असावी असा संशय आहे. हा सर्व प्रकार महानगरपालिका प्रशासनात अनागोदी, मनमानी भोंगळ कारभार करुन नियमबाह्य बदल्यांचे दि.29/09/2016 चे आदेश हे निर्गमित केलेले असून ते मागासवर्गीय अधिका-यांवर अन्याय करणारे आहेत. त्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा नियमा अंतर्गत महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 चे कलम 4 व नियम 2013 मधील तरतुदींचे उल्लंघन झालेले असून उक्त शासन परिपत्रकातील तरतुदीस केराची टोपली दाखविली आहे. त्यामुळे निर्गमित आदेश दिनांक 29/09/2016 चे बदली आदेश रद्द करण्यात यावे, ही विनंती.

<u>विनंती</u>

विनंती करण्यात येते की, माझे अपील मान्य करण्यात यावे तसेच कार्यालयीन आदेश क्र. नांवाशमनपा/आकक्ष/8798/2016 दि. 29/09/2016 चे बदली आदेश रद्द करण्यात यावे, ही विनम्र विनंती.

अपीलार्थी<br>
स्वाक्षरीत/-<br>
(प्रकाश माधवराव येवले)<br>
सहा.आयुक्त,<br>
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

स्थळ : नांदेड<br>
दिनांक : 13/10/2016

**सभापती** बदली करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना असल्यामुळे श्री प्रकाश माधवराव येवले सहाय्यक आयुक्त यांनी बदली आदेशा विरुध्द केलेली अपिल नामंजुर करण्यात येतो.

**ठराव क्रं.९६** **ठराव**

बदली / पदस्थापना करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना असल्याने श्री प्रकाश माधवराव येवले सहाय्यक आयुक्त यांनी बदली आदेशा विरुध्द केलेली अपिल नामंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

## विषय क्रं.१२

प्रति,<br>
**मा. सभापती साहेब,**<br>
स्थायी समिती<br>
नावाशमनपा नांदेड

**विषय** :- गोठविण्यात आलेली एक वार्षीक वेतनवाढ पुर्ववत चालु करणे बाबत

**संदर्भ** :- १) का.आ.क्रं. मनपा/आस्था-६/९४१६/०६ दि. ०४.१०.१६

२) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रं सीडीआर-१३९६/प्र.क्र.६/११-अ दि.२० जुलै ०६

३) का.आ.क्रं. मनपा/आस्था-१/१४६७८/०७ दि. ०८.०२.०७

४) का.आ.क्रं. मनपा/आस्था-६/२५३८/१५ दि. २५.०५.१५

आदरणीय सभापती महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भ क्रं. १ चे आदेशान्वये मला गैरशिस्तीमुळे कार्यालयाने निलंबीत केले होते त्या बाबत मी माझे स्पष्टीकरण सादर करुन माझी चुक कबुल केलेली असल्यामुहे संदर्भ क्रं. २ चे शासन निर्णयात जसे फौजदारी गुन्हा नोंदविण्यात आलेला नाही परंतु गैर वर्तणुकीच्या कारणास्तव शासकिय सेवकास (विभागीय चौकशी सुरु केलेली असेल अथवा नसेल) निलंबीत केलेले असल्यास अशा प्रकरणात पुर्नस्थापित करण्या बाबतचा निर्णय प्रकरण परत्व गुणवत्तेनुसार घ्यावा असे नमुद असल्यानुसार माझी मनपाकेतील सेवा जेष्ठता लक्षात घेवुन मा. आयुक्त साहेबांनी संदर्भ क्रं. ४ चे आदेशान्वये मला कामावर पुन:स्थापित करण्यात आले असुन सध्या मी आरोग्य विभागात लिपीक या पदावर कार्यरत आहे.

तसेच संदर्भ क्रं. ४ चे कार्यालयीन आदेशाव्दारे मु.प्रा.मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६(४) मधील तरतुदीनुसार कालावधी क्षमापणाची याचना करुन वरिष्ठ प्राधिकरण स्थायी समितीकडे माझी अपिल करण्यात यावे असे कळविण्यात आल्यानुसार यापुर्वीच माझी चुक मी कबुल केलेली असल्यामुहे व पुनश्च अशा प्रकारचे गैरकृत्य माझ्याकडून होणार नसल्याबाबत मी लेखी ग्वाही देत असुन मला एवढी मोठी शिक्षा न करता संदर्भ क्रं. ३ चे आदेशान्वये गोठविण्यात आलेली माझी एक वर्षाची वेतनवाढ पुर्ववत चचालु करण्यात यावी व त्या बदल्यात कमी शिक्षा माझेवर लादुन माझा उक्त तिन महिण्याचा निलंबन कालावधी शिल्लक असलेल्या रजेत समाविष्ठ करण्यात यावा हि नम्र विनंती.

आपला विश्वासु<br>
स्वाक्षरीत/-<br>
दिलीप गोविंदराव गायकवाड<br>
लिपीक नावाशमनपा नांदेड

**सभापती** श्री दिलीप गांविंदराव गायकवाड लिपीक यांनी केलेली अपिल मंजुर करण्यात येते आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.९७** **ठराव**

श्री दिलीप गोविंदराव गायकवाड लिपीक यांनी पुढील प्रमाणे स्थायी समितीकडे अपिल केलेले आहेत. का.आ.क्रं. मनपा/आस्था-६/९४१६/०६ दि. ०४.१०.१६ चे आदेशान्वये मला गैरशिस्तीमुळे कार्यालयाने निलंबीत केले होते त्या बाबत मी माझे स्पष्टीकरण सादर करुन माझी चुक कबुल केलेली असल्यामुळे महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रं सीडीआर-१३९६/प्र.क्र.६/११-अ दि. २० जुलै ०६ शासन निर्णयात जसे फौजदारी गुन्हा नोंदविण्यात आलेला नाही परंतु गैर वर्तणुकीच्या कारणास्तव शासकिय सेवकास (विभागीय चौकशी सुरु केलेली असेल अथवा नसेल) निलंबीत केलेले असल्यास अशा प्रकरणात पुर्नस्थापित करण्या बाबतचा निर्णय प्रकरण परत्व गुणवत्तेनुसार घ्यावा असे नमुद असल्यानुसार माझी मनपाकेतील सेवा जेष्ठता लक्षात घेवुन मा. आयुक्त साहेबांनी का.आ.क्रं. मनपा/आस्था-६/२५३८/१५ दि. २५.०५.१५ चे आदेशान्वये मला कामावर पुन:स्थापित करण्यात आले असुन सध्या मी आरोग्य विभागात लिपीक या पदावर कार्यरत आहे.

तसेच का.आ.क्रं. मनपा/आस्था-६/२५३८/१५ दि. २५.०५.१५ चे कार्यालयीन आदेशाव्दारे मु.प्रा.मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६(४) मधील तरतुदीनुसार कालावधी क्षमापणाची याचना करुन वरिष्ठ प्राधिकरण स्थायी समितीकडे माझी अपिल करण्यात यावे असे कळविण्यात आल्यानुसार यापुर्वीच माझी चुक मी कबुल केलेली असल्यामुहे व पुनश्च अशा प्रकारचे गैरकृत्य माझ्याकडून होणार नसल्याबाबत मी लेखी ग्वाही देत असुन मला एवढी मोठी शिक्षा न करता का.आ.क्रं. मनपा/आस्था-१/१४६७८/०७ दि. ०८.०२.०७ चे आदेशान्वये गोठविण्यात आलेली माझी एक वर्षाची वेतनवाढ पुर्ववत चालु करण्यात यावी व त्या बदल्यात कमी शिक्षा माझेवर लादुन माझा उक्त तिन महिण्याचा निलंबन कालावधी शिल्लक असलेल्या रजेत समाविष्ठ करण्यासाठी केलेली अपिल हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

<u>विशेष बाब म्हणुन आयत्यावेळी घेण्यात आलेले विषय</u>

## विषय क्रं.०१

नावाशमनपा हद्दीत **मित्रनगर व सखोजीनगर रस्त्याचे डांबरीकरण करणे (हॉटमिक्स हॉटलेड बि.टी) रुपये १७,४८,८००/-** साठी ई. टेंडर सेल व्दारे निविदा सुचना जा.क्रं. साबांवि/११०३/ २०१६ दि. २८.०४.१६ अन्वये दै. दिव्य मराठी / दै गोदातीर समाचार या वर्तमान पत्रात दिनांक २९.०४.१६ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली असता उपरोक्त कामासाठी एकूण ३ निविदा प्राप्त झाले प्राप्त निविदा त्रीसदस्यीय समिती समोर दिनांक ०६.०६.१६ रोजी उघडण्यात आले असता त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| ०१ | मे. गुरु रामदास कन्सट्रक्शन नांदेड | ०.२५% कमी दराने |
| ०२ | प्रविण कन्सट्रक्शन नांदेड | ५% जास्त दर |
| ०३ | स्वान इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड | ७% जास्त दर |

तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा मे. गुरु रामदास कन्सट्रक्शन नांदेड यांची निविदा अंदाजपत्रक दरापेक्षा ०.२५% कमी दराची आहे.

करिता **मित्रनगर व सखोजी नगर रस्त्याचे डांबरीकरण करणे (हॉटमिक्स हॉटलेड बि.टि) करणेसाठी मे. गुरु रामदास कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रक दरापेक्षा ०.२५% कमी दराची असल्याने मंजुरीस्तव प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.**

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या निविदा मंजुरीचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते.

**ठराव क्रं.९८** **ठराव**

नावाशमनपा हद्दीत **मित्रनगर व सखोजीनगर रस्त्याचे डांबरीकरण करणे (हॉटमिक्स हॉटलेड बि.टी) रुपये ९७,४८,८००/-** साठी ई. टेंडर सेल व्दारे निविदा सुचना जा.क्रं. साबांवि/११०३/ २०१६ दि. २८.०४.१६ अन्वये दै. दिव्य मराठी / दै गोदातीर समाचार या वर्तमान पत्रात दिनांक २९.०४.१६ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली असता उपरोक्त कामासाठी एकूण ३ निविदा प्राप्त झाले प्राप्त निविदा त्रीसदस्यीय समिती समोर दिनांक ०६.०६.१६ रोजी उघडण्यात आले असता त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| ०१ | मे. गुरु रामदास कन्सट्रक्शन नांदेड | ०.२५% कमी दराने |
| ०२ | प्रविण कन्सट्रक्शन नांदेड | ५% जास्त दर |
| ०३ | स्वान इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड | ७% जास्त दर |

तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा मे. गुरु रामदास कन्सट्रक्शन नांदेड यांची निविदा अंदाजपत्रक दरापेक्षा ०.२५% कमी दराची आहे.

करिता **मित्रनगर व सखोजी नगर रस्त्याचे डांबरीकरण करणे (हॉटमिक्स हॉटलेड बि.टि) करणेसाठी मे. गुरु रामदास कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रक दरापेक्षा ०.२५% कमी दराची निविदा हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते.**

## विषय क्रं.०२

दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका **जुना कौठा भागात अजिंठा बौध्द विहार परिसराचे नव्याने बांधकाम करणे** अंदाजपत्रक **रुपये १,३१,५१,१७८/-** साठी ई टेंडर सेल व्दारे निविदा सुचना क्रं. साबावि/४७००/२०१६ दिनांक १५.०७.२०१६ अन्वये दैनिक दिव्यमराठी / दैनिक लोकपत्र या वर्तमानपत्रात दिनांक १६.०७.२०१६ रोजी तिस-यांदा निविदा प्रसिध्द करण्यात आली असता उपरोक्त कामासाठी एकूण १ (एक) निविदा प्राप्त झाली प्राप्त निविदा त्रीसदस्य समिती समोर दिनांक ०५.१०.२०१६ रोजी उघडण्यात आल्या असता त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| ०१ | प्रविण कन्सट्रक्शन नांदेड | ८.७८६% जास्त दर |

तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा प्रविण कन्सट्रक्शन नांदेड यांची असुन ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.७८६% जास्त दराची आहे.

कंत्राटदाराने भरलेले दर जास्त वाटत असल्यामुळे कंत्राटदारास दर कमी करण्यासाठी वाटाघाटी करिता पाचारण केले असता संबंधीतानी लेखी पत्र देवुन सदर काम अंदाजपत्रक दरापेक्षा ८.७८६% जास्त दराऐवजी अंदाजपत्रक दरावर करण्याची समंती दिली आहे.

**करिता दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका जुना कौठा भागात अजिंठा बौध्द विहार परिसराचे नव्याने बांधकाम करणेसाठी प्रविण कन्सट्रक्शन नांदेड यांची वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.**

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या निविदा मंजुरीचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते.

**ठराव क्रं.९९** **ठराव**

दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका **जुना कौठा भागात अजिंठा बौध्द विहार परिसराचे नव्याने बांधकाम करणे** अंदाजपत्रक **रुपये १,३१,५१,१७८/-** साठी ई टेंडर सेल व्दारे निविदा सुचना क्रं. साबावि/४७००/२०१६ दिनांक १५.०७.२०१६ अन्वये दैनिक दिव्यमराठी / दैनिक लोकपत्र या वर्तमानपत्रात दिनांक १६.०७.२०१६ रोजी तिस-यांदा निविदा प्रसिध्द करण्यात आली असता उपरोक्त कामासाठी एकूण १ (एक) निविदा प्राप्त झाली प्राप्त निविदा त्रीसदस्य समिती समोर दिनांक ०५.१०.२०१६ रोजी उघडण्यात आल्या असता त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| ०१ | प्रविण कन्सट्रक्शन नांदेड | ८.७८६% जास्त दर |

तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा प्रविण कन्सट्रक्शन नांदेड यांची असुन ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.७८६% जास्त दराची आहे.

कंत्राटदाराने भरलेले दर जास्त वाटत असल्यामुळे कंत्राटदारास दर कमी करण्यासाठी वाटाघाटी करिता पाचारण केले असता संबंधीतानी लेखी पत्र देवुन सदर काम अंदाजपत्रक दरापेक्षा ८.७८६% जास्त दराऐवजी अंदाजपत्रक दरावर करण्याची समंती दिली आहे.

**करिता दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका जुना कौठा भागात अजिंठा बौध्द विहार परिसराचे नव्याने बांधकाम करणेसाठी प्रविण कन्सट्रक्शन नांदेड यांची वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दराची निविदा हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते.**

**सभापती** आजच्या सभेचे कामकाज संपल्यामुळे सभा संपल्याचे जाहीर करण्यात येते.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव**
नावाशमनपा नांदेड

**स्वाक्षरीत/-**
**सभापती**
स्थायी समिती
नावाशमनपा नांदेड